# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, दुसरा मजला, (दक्षिण कक्ष) बेलापूर,नवी मुंबई -४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७ १६७३, २७५७ ०१६६, २७५७ १६७७.
फॅक्स : २७५७ ०९६९, २७५७ १६६६.


जा.क्र-२०२०/बैठक-१४९/(२९)/आ.४

दिनांक : 23/०६/२०२१

**प्रति,**
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (न.वि.२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**विषय :** दिनांक १६ जून, २०२१ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १४९व्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

दिनांक १६ जून, २०२१ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १४९व्या बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

आपली विश्वासू,

**(दिपाली देशपांडे-सावेडकर)**
**मुख्य प्रशासकीय अधिकारी.**

**प्रत:- माहितीसाठी.**
खाजगी सचिव (मा.मंत्री,पा.पु. व स्व. तथा अध्यक्ष,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.)
सोबतचे इतिवृत्त मा.मंत्री, पा.पु. स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे, ही विनंती.

खाजगी सचिव (मा.राज्यमंत्री, पा.पु. व स्व. तथा उपाध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.)

सोबतचे इतिवृत्त मा.राज्यमंत्री, पा.पु. स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे, ही विनंती.

**प्रत: माहितीसाठी व त्वरित कार्यवाहीसाठी.**

संचालक (वित्त), म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

उप सचिव (पापु-२३), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

मुख्य अभियंता, म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, ठाणे/पुणे/नाशिक/औरंगाबाद /अमरावती/नागपूर.

अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा, म.नि.सं. व सं.कक्ष, मित्तल चेंबर्स, मुंबई.

अधीक्षक अभियंता (मुख्यालय), म.जी.प्रा., मुंबई.

उप मुख्य लेखाधिकारी (१ २) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

आस्थापना अधिकारी (दक्षता), म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

उप अभियंता तथा मालमत्ता व्यवस्थापन (कक्ष - ९) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

उप अभियंता (आय.टी.सेल), मित्तल चेंबर्स, मुंबई.

प्रशासकीय नि आस्थापना अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

सर्व कक्ष अधिकारी / कार्यासन अधिकारी (आस्थापना - ) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

सोबतचे इतिवृत्तातील आपल्या कार्यालयाशी संबंधीत कार्यक्रम बाबींवर त्वरित योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा कार्यपुर्ती अहवाल १० दिवसांत मध्यवर्ती कार्यालयास सादर करावा.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १४९व्या बैठकीचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १४९वी बैठक मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.श्री.गुलाबराव पाटील यांचे अध्यक्षतेखाली मा.मंत्री, महोदय यांचे दालनात बुधवार दिनांक १६ जून, २०२१ रोजी दुपारी १.०० वाजता संपन्न झाली. या बैठकीस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) मा.श्री.गुलाबराव पाटील, मंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२) मा.श्री.संजय बनसोडे, राज्यमंत्री, पा.पु.व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
३) श्री.संजय चहांदे, अपर मुख्य सचिव, पा.पु.व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई
४) श्री.किशोर राजे निंबाळकर, सदस्य सचिव, म.जी.प्रा. तथा प्राधिकरणाचे सदस्य सचिव, मुंबई.

या व्यतिरिक्त सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

२) श्री.वाय.बी.पाटील, संचालक (वित्त), म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.
३) श्रीमती.दिपाली देशपांडे-सावेडकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा. मुंबई.
४) श्री. प्रशांत भामरे, अधीक्षक अभियंता (मु.), म.जी.प्रा.मुंबई.

सर्व प्रथम मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मा.मंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, यांच्या परवानगीने बैठकीस सुरुवात करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.:- १ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या च्या १४८व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १४८वी बैठक दिनांक १२ मे, २०२१ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव संचालक मंडळास सादर करण्यात आला व त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास केली.

इतिवृत्तावर चर्चा होऊन, १४८व्या बैठकीच्या इतिवृत्तास संचालक मंडळाने मान्यता दिली.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. २:-** म.जी.प्रा.च्या १४८व्या बैठकीपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कृतीस मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची दिनांक १२ मे, २०२१ रोजी संपन्न झालेल्या १४८व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले, त्या निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव, यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार १४८व्या बैठकीपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३ :-** म.जी.प्रा.कडील कंत्राटदार/उत्पादक नोंदणी/नळ जोडणीसाठी शासकीय सोयी सुविधाकरिता शपथपत्राऐवजी स्वघोषणापत्र व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती स्विकारण्याबाबत.

मा. संचालक मंडळाची दि. १६ जुन २०२१ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत मजीप्राकडील कंत्राटदार नोंदणी/ उत्पादक नोंदणी / नळ जोडणी साठी शासकिय सोयी सुविधाकरिता शपथपत्राऐवजी स्वघोषणापत्र व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती स्विकारण्याबाबत शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि ०९ मार्च २०१५ मधील तरतुदी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास लागु करण्याबाबतच्या कार्यक्रम बाबी वर सविस्तर चर्चा करण्यात आली व त्या बाबतचा ठराव खालील प्रमाणे पारीत करण्यात आला.

**ठराव:-**

असा ठराव करण्यात येतो कि महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रसुधा/१६१४/३४५/प्र.क्र.७१/१८-अ **दि. ९.०३.२०१५** च्या शासन निर्णयात असलेल्या तरतुदी नुसार **मजीप्राकडील कंत्राटदार नोंदणी/ उत्पादक नोंदणी / नळ जोडणी** साठी शासकिय सोयी सुविधाकरिता शपथपत्राऐवजी स्वघोषणापत्र व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती स्विकारण्याबाबत प्रस्तावात नमुद केल्यानुसार बदल करणे विषयी मान्यता देण्यात येत आहे.

**शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ९.३.२०१५** रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदी नुसार मजीप्रा तर्फे कंत्राटदारांना देण्यात येणारी नोंदणी, साहित्य पुरवठादार यांना देण्यात येणारी नोंदणी तसेच क्षेत्रिय स्तरावर पाणी पुरवठ्यासाठी देण्यात येणारी नळ जोडणी

किशोर राजे निंबाळकर

अध्यक्ष तथा

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

प्रस्तावातील आवश्यक कागदपत्रे शपथपत्राऐवजी स्वघोषणापत्र व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती स्विकारण्याबाबत प्रचलित नियमात खालील प्रमाणे बदलास मान्यता देण्यात येत आहे.

**अ)मजीप्राच्या नोंदणी नियमावलीमधील मुद्दा क्र.१.०१ नुसार कंत्राटदार नोंदणीसाठी आवश्यक असलेले कागदपत्रे/ दस्तऐवजांची यादी, प्रपत्र - अ**

| अ.क्र | कागदपत्रे/ दस्तऐवज | प्रचलित नियमावलीनुसार कागदपत्रे/ दस्तऐवज साक्षांकित व शपथपत्र स्टॅम्प पेपरवर केले जातात. | दि. ९.३.२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार शपथपत्राऐवजी स्वघोषणापत्र व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती स्विकारण्याबाबतचा तपशिल |
|---|---|---|---|
| | संपूर्ण भरलेला विहित नमुन्यातील अर्ज (परिशिष्ट-अ) व खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. | मूळ | मूळ |
| १. | विहित नमुन्यातील अलिकडच्या कालावधीतील बँक सॉल्वहन्सी सर्टिफिकेट (परिशिष्ट-ब). बँक सॉल्वहन्सी वैधता कालावधी १ वर्षाचा असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्याबाहेरील कंत्राटदार यांनी महाराष्ट्र राज्यातील नॅशलाईज / शेड्युल बँकेची मूळ सॉल्वहन्सी सर्टिफिकेट सादर करणे आवश्यक आहे. | मूळ | मूळ |
| २. | केलेली कामे व हाती असलेली कामे यांची एकत्रित यादी विहित नमुन्यातील गोषवारा (परिशिष्ट-क) सबंधित खात्याकडील परिशिष्ट क मधील मूळ/ साक्षांकित सर्टिफिकेटच्या प्रती | साक्षांकित | स्वयंसांक्षांकित |
| ३. | जर खाजगी कामे केलेली असतील तर आवश्यक कागदपत्रे | | |
| | अ) केलेल्या कामाबाबतचा विहित नमुन्यातील परवानाधारक अर्किटेक्टचा दाखला (परिशिष्ट-ड) | मूळ | मूळ |
| | ब) खाजगी कामे चार्टेर्ड अकाऊंटंट यांनी प्रमाणित केलेली वार्षिक उलाढालीमध्ये समाविष्ट असली पाहिजेत. चार्टेर्ड अकाऊंटंट प्रमाणपत्र | मूळ | मूळ |
| | क) नगरपालिका/ ग्रामपंचायत यांच्याकडील खाजगी कामाच्या परवानगीबाबतचे कागदपत्रे | साक्षंकित | स्वयंक्षांकित |
| | ड) आयकरबाबतचा नमुना क्र.१६ | साक्षांकित | स्वयंसाक्षांकित |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

किशोर जे. निंबाळकर
सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | आयकराबाबतचा अद्ययावत दाखला | साक्षांकित | स्वयंसांक्षांकित |
| ५. | कंत्राटदाराकडील तांत्रिक कर्मचाऱ्यांची यादी त्यांची शैक्षणिक अर्हता व अनुभवांच्या प्रमाणपत्रासह | स्वयंसाक्षांकित | स्वयंसांक्षांकित |
| ६. | कंत्राटदाराकडील मशिनरिबाबतची यादी. मशिनरीचे ठिकाणासह | स्वयंसाक्षांकित | स्वयंसांक्षांकित |
| ७. | पार्टनरशिप डीड | साक्षांकित | स्वयंसांक्षांकित |
| ८. | मुखत्यार पत्र | साक्षांकित | स्वयंसांक्षांकित |
| ९. | कामगार कायदा नियम-१९७० नुसार आवश्यक नोंदणी प्रमाणपत्र. | नसेल तर त्याची आवश्यकता का नाही याबाबतचे स्टॅम्प पेपरवर शपथपत्र घेतले जाते. | स्वयंघोषित साध्या कागदावर |
| १०. | बायोडाटा वैयक्तिक प्रोप्रायटरसाठी | स्वयंसाक्षांकित | स्वयंसांक्षांकित |
| ११. | सार्वजनिक बांधकाम विभाग/ CPWD/ बृहन्मुंबई महानगरपालिका / इतर शासकीय/ निमशासकीय यांचेकडील नोंदणीकृत असल्याबाबतच्या दाखल्याच्या प्रती | साक्षांकित | स्वयंसांक्षांकित |
| १२. | एकमेव पार्टनर/ डायरेक्टर्स / मुखत्यार पत्र याबाबतची सर्व प्रकारच्या झेरॉक्स कॉपी व फोटोग्राफ. | साक्षांकित | स्वयंसांक्षांकित |
| १३ | अर्जासोबत नोंदणी फी ५०% नापरतावा मजीप्रास भरणे आवश्यक आहे. | -- | -- |
| १४. | अर्जदाराच्या नमुना स्वाक्षऱ्या (परिशिष्ट-इ) प्रोपायटर/ पार्टनर/ मुखत्यार पत्र/ कंत्राटदार/ कंपनीचा आर्किटेक्ट | राजपत्रित अधिकाऱ्याच्या समक्ष | राजपत्रित अधिकाऱ्याच्या समक्ष |
| १५. | खालील बाबींकरिता सर्टीफिकेट सादर करणे आवश्यक आहे. (परिशिष्ट-फ)<br>अ) करारनामा नियम क्र. ३ नुसार कार्यवाही न झालेबाबत.<br>ब) शासकीय/ निमशासकीय कार्यालयाकडे काळ्या यादीत टाकले नसल्याबाबत. | स्टॅम्प पेपरवर शपथपत्र | स्टॅम्प पेपरवर शपथपत्र |
| | क) जर सादर केलेले कागदपत्र वैध नसल्याचे निदर्शनास आल्यास प्रस्तावाच्या वेळेस अथवा नोंदणी दिली असल्यास नोंदणी रद्द करण्याबाबत माझी काहीही हरकत नसल्याबाबत. | स्टॅम्प पेपरवर शपथपत्र | स्टॅम्प पेपरवर शपथपत्र |
| १६. | अ) मागील ३ वर्षाचे सेल्स टॅक्स सर्टिफिकेट<br>ब) महाराष्ट्र सेल्स टॅक्स सर्टिफिकेट | साक्षांकित<br>साक्षांकित | स्वयंसांक्षांकित<br>स्वयंसांक्षांकित |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | | |
|---|---|---|---|
| १७. | इलेक्ट्रीकल / मेकॅनिकल कंत्राटदार नोंदणीसाठी उद्योग व उर्जा विभागाचे परवाना पत्र. | साक्षांकित | स्वयंसांक्षांकित |
| १८. | कंत्राटदाराचे गोपनीय अहवाल, (परिशिष्ट-ह) | मूळ | मूळ |

**नोट:-** स्वयंसांक्षांकित प्रतीच्या सत्यते बाबत स्वघोषणापत्र आवश्यक राहील.

**ब) नळ जोडणीकरिता आवश्यक असलेल्या कागदपत्रे / दस्तऐवजांची सुची.**

**प्रपत्र - ब**

| अ. क्र | नळ जोडणीकरिता आवश्यक असलेली कागदपत्रे | साक्षांकन | |
|---|---|---|---|
| | | सद्य:स्थिती | प्रस्तावित |
| १. | संपूर्ण भरलेला अर्ज | मूळ | मूळ |
| २. | ओळखपत्राचा पुरावा (पॅनकार्ड/ आधारकार्ड/ पारपत्र/ ड्रायव्हिंग लायसन्स/ निवृत्तीवेतन पासबुक) यापैकी कोणतेही एक | साक्षांकित | स्वयंसाक्षांकित |
| ३. | निवासी पुरावा | साक्षांकित | स्वयंसाक्षांकित |
| ४. | जर अर्जदार भाडेकरू असेल तर संबंधित बांधकामाच्या मालकाचा ना हरकत दाखला | साक्षांकित | स्वयंसाक्षांकित |
| ५. | स्थानिक स्वराज्य संस्थेचा ना हरकत दाखला | मूळ | मूळ |
| ६. | गृहनिर्माण संस्थेचा ना हरकत दाखला (दुकान / घर इ.साठी) | मूळ | मूळ |
| ७. | अनिवासी वापराकरिता देण्यात आलेले वैध प्रमाणपत्र (उदा. उपहारगृहासाठी मनपा अधिनियम- ३९४ अन्वये दिलेले प्रमाणपत्र/ नगरपालिकेचे वैध दुकाने आणि आस्थापना प्रमाणपत्र) | साक्षांकित | स्वयंसाक्षांकित |
| ८. | अस्तित्वातील नळ जोडण्यांची संख्या व त्यांचे अद्ययावत देयक व थकबाकी भरल्याची पावती | साक्षांकित | स्वयंसाक्षांकित |
| ९. | कंपनीचे/गृहनिर्माण संस्थेचे / धर्मादाय आयुक्तांचे नोंदणी प्रमाणपत्र अथवा भागीदारी संस्थांची नोंदणी दस्तऐवज | साक्षांकित | स्वयंसाक्षांकित |
| १० | कंपनीचे गृहनिर्माण संस्थेचे/ सरकारी यंत्रणेचे मुखत्यार पत्र. | साक्षांकित | स्वयंसाक्षांकित |
| ११ | हमीपत्र | मूळ | मूळ |
| १२ | परवानाधारक कारागिरांचा नकाशासह दाखला | मूळ | मूळ |

**नोट:-** स्वयंसांक्षांकित प्रतीच्या सत्यते बाबत स्वघोषणापत्र आवश्यक राहील.

**क) विविध साहित्यांच्या उत्पादकांचे प्राधिकरणाकडे अधिकृत उत्पादक म्हणुन नोंदणी बाबत:-** विविध साहित्यांच्या उत्पादकांचे प्राधिकरणाकडे अधिकृत उत्पादक म्हणुन

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

नोंदणी संदर्भात त्यांच्या कंपनीस अथवा उत्पादीत होणारे साहित्य हे कोणत्याही शासकिय निमशासकिय कार्यालयामार्फत काळया यादित टाकण्यात आलेले नाही याबाबत चे प्रतिज्ञापत्र तसेच फॅक्टरी लायसन्स लागु नसले बाबतचे प्रतिज्ञापत्र स्टॅम पेपरवर सादर करणे आवश्यक आहे. व इतर कागदपत्रे स्वसाक्षांकित स्विकारणेस हरकत नाही. (**नोट:-** स्वयंसांक्षांकित प्रतीच्या सत्यतेबाबत स्वघोषणापत्र आवश्यक राहील.)

उपरोक्त प्रमाणे पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यास मा.सदस्य सचिव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.४ :-** इगतपुरी पाणी पुरवठा केंद्र, इगतपुरी ता.इगतपुरी, जि.नाशिक घसारा निधीतून करावयाच्या कामांबाबत.

इगतपुरी पाणी पुरवठा केंद्र ता. इगतपुरी, जि. नाशिक येथील घसारा निधीतून करावयाच्या कामांबाबतची माहिती कार्यक्रम बाबीनुसार संचालक मंडळापुढे पुढीलप्रमाणे सादर करण्यात आली.

दि.१३ व १४ मार्च, २०२१ रोजी मा. सदस्य सचिव, मजीप्रा यांनी सदर पाणी पुरवठा केंद्रास भेट देवून पाहणी केली. सदर पाहणीच्या वेळी, सदर पाणी पुरवठा केंद्रामध्ये विविध उपांगांची रंगरंगोटी, इलेक्ट्रीफिकेशन तसेच इतर काही आवश्यक दुरुस्त्या असल्यास त्यासंबंधीचे अंदाजपत्रक त्यास घसारा निधीतून कामे करण्यासंबंधीचा प्रस्ताव सादर करण्याविषयी सदस्य सचिव, मजीप्रा यांनी क्षेत्रिय अधिकाऱ्यांना सूचना दिल्या होत्या. त्यानुसार, क्षेत्रिय कार्यालयाकडून पुढील कामांसाठी लागणाऱ्या निधीबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला.

| क्र. | कामे | किंमत |
|---|---|---|
| १ | उंच जलकुंभ व जलशुध्दीकरण केंद्राजवळील कंपाऊंड वॉलची दुरुस्ती. | रु.१०.२६ लक्ष |
| २ | इन्स्पेक्शन बंगल्याची दुरुस्ती | रु.३.७४ लक्ष |
| ३ | इन्स्पेक्शन बंगला व जलशुध्दीकरण केंद्रामधील इलेक्ट्रीफिकेशन | रु.०.२२ लक्ष |
| ४ | जलशुध्दीकरण केंद्र व फिल्टर हाऊसमधील दुरुस्ती. | रु.४.५७ लक्ष |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | |
|---|---|---|
| ५ | जलशुध्दीकरण केंद्रामधील २०० मि.मी. व्यासाचे पीव्हीसी पाईप्सचे ट्रफ बदलणे व इतर अनुषंगिक कामे. | रु.०.४८ लक्ष |
| ६. | १६ लक्ष लिटर क्षमतेच्या उंच जलकुंभाची दुरुस्ती. | रु.१२.२३ लक्ष |
| ७. | आयओटी वर आधारित गुरुत्ववाहिनीतील वॉल ऑटोमेशन व इतर अनुषंगिक दुरुस्त्या. | रु.४.०३ लक्ष |
| ८. | विश्रामगृह येथे हायमास्ट लाईट बसविणे. | रु.३.९७ लक्ष |
| ९. | जलशुध्दीकरण केंद्र परिसरातील गार्डनिंग करणे. | रु.०.४८ लक्ष |
| १०. | पाणी पुरवठा केंद्रासाठी फर्निचर, संगणक व्यवस्था, इत्यादिंचा पुरवठा करणे. | रु.१.१३ लक्ष |
| | **एकूण** | **रु.४१.११ लक्ष** |

सन १९८८ मध्ये सदर योजना कार्यान्वित झाल्यापासून आजतागायत मोठ्या स्वरुपाची कोणतीही दुरुस्ती न करण्यात आल्याने बाब तसेच वरीलप्रमाणे प्रस्तावित दुरुस्तीची कामे करण्यासाठी रु.४१.११ लक्ष इतका निधी, मजीप्राच्या घसारा निधीतून उपलब्ध करुन देण्याविषयी मा.संचालक मंडळाच्या बैठकीत विनंती करण्यात आली.

वरील प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, मा.संचालक मंडळाच्या बैठकीत सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आली व पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

वरीलप्रमाणे कार्यक्रम बाबीमध्ये प्रस्तावित दुरुस्तीची कामे करण्यासाठी रु.४१.११ लक्ष इतका निधी, मजीप्राच्या घसारा निधीतून उपलब्ध करुन देण्यास मा.संचालक मंडळाच्या आगामी बैठकीत मान्यता देण्यात येत आहे. सदर काम नियमानुसार विहीत ईनिविदा प्रणालीव्दारे करुन घेण्यात यावे.

यासाठी पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.५ :-** पानोडी व ९ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ता.संगमनेर जि.अहमदनगर योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या आरसीसी साठवण तलावातील पाण्याची गळती बाबत म.जी.प्रा.मार्फत करण्यात आलेली कार्यवाही, सद्यस्थिती, योजना आहे त्या स्थिती अंतिम करणे इत्यादी प्रस्ताव.

पानोडी व ९ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ता.संगमनेर जि.अहमदनगर योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या आरसीसी साठवण तलावातील पाण्याची गळती बाबत मजीप्रा मार्फत करण्यात आलेली कार्यवाही, सध्यस्थिती, योजना आहे त्या स्थितीत अंतिम करणे, इ. बाबतची सविस्तर माहिती कार्यक्रम बाबीनुसार संचालक मंडळापुढे पुढीलप्रमाणे मांडून पुढीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात आला.

अ) या कार्यालयाचे पत्र क्र.तांशा-२/६१३ दि.१६.९.२०२० नुसार गठीत करण्यात आलेल्या, श्री.सुभाष भुजबळ, मुख्य अभियंता (प्र), मजीप्रा, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली सौ.वैशाली आवटे, का.अ., मजीप्रा, पुणे, श्री.भांडेकर, का.अ., मजीप्रा, सोलापूर व श्री.सुबोध मोरे, स.का.अ., मजीप्रा, मनमाड या सदस्यांचा समावेश असलेल्या समितीने त्यांचे पत्र क्र.तांशा/६७७ दि.२३.४.२०२१ अन्वये, समितीने सादर केलेल्या अहवालामधील निष्कर्ष हे, तत्कालीन संचालक (तांत्रिक) यांचे आदेश क्र.संचालक(तां)/पानोडी/४९८, दि.७.६.२०१७ अन्वये निर्गमित केलेल्या निष्कर्षाशी मिळते जुळते असल्याचे निदर्शनास येते.

ब) सदर योजनेच्या साठवण तलावाच्या गळतीच्या संदर्भात चालू असलेल्या संबंधीत अधिकाऱ्यांवरील विभागीय चौकशीच्या संदर्भात मुख्य अभियंता, मजीप्रा, नाशिक यांनी त्यांचे पत्र क्र.तांशा-२/१२ दि.४.१२.२०१९ अन्वये सादर केलेल्या अभिप्रायदर्शक अहवालामध्ये साठवण तलावाची गळती प्रतिबंधक उपाययोजना सुचविणारी मे.शाकंबरी संस्था, प्रत्यक्ष काम करणारे ठेकेदार मे.व्ही.एम. मातेरे आणि मजीप्राचे तत्कालीन अधिकारी जबाबदार असल्याचे दिसून येत असल्याबाबतचा अभिप्राय दिलेला आहे. सदर अहवाल मान्य करण्याचे प्रस्तावीत आहे.

क) सदर योजनेच्या साठवण तलावाच्या गळतीच्या संदर्भात चालू असलेल्या संबंधीत अधिकाऱ्यांवरील विभागीय चौकशीच्या संदर्भात मुख्य अभियंता, मजीप्रा, नाशिक यांनी

अध्यक्ष तथा
मंत्री पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा

त्यांचे पत्र क्र.प्रलि/पानोडी/४७५दि.१२.३.२०२१ अन्वये पुढीलप्रमाणे अहवाल सादर केला आहे. साठवण तलावाच्या खोदाई, फाऊन्डेशन, हेवी ब्लॉस्टिंग इ. बाबी ज्या अधिकाऱ्यांच्या काळात झालेले आहेत, याबाबी तांत्रिक दृष्ट्या योग्यपणे न झाल्याने पाण्याची संपूर्ण गळती ही साठवण तलावाच्या तळातून फाऊंडेशन मधून होत आहे. त्यामुळे खोदाई व फाऊंडेशन ही कामे करणारे योजनेचे बांधकाम करणारे ठेकेदार सुध्दा तितकेच जबाबदार आहे. त्याचप्रमाणे मजीप्रा ला तत्सम स्ट्रक्चर मधील गळती काढण्यासंदर्भात पुरेसा अनुभव नसल्यामुळे शाकंभरी या तज्ञ संस्थेला गळती काढण्याच्या कामाचे सल्लागार म्हणून नेमण्यात आले होते. त्यांनी स्पष्ट केले होते की, त्यांच्या सल्ल्यानुसार व देखरेखी खाली काम केल्यास ९० टक्के गळती हमखास कमी होईल, मात्र त्यानुसार काम करूनही गळती बंद झाली नाही. त्यामुळे मे.शाकंबरी, ठाणे ही तज्ञ यंत्रणाही तितकीच जबाबदार आहे. सदर अहवालामधील अभिप्राय योग्य आहे असे प्रस्तावीत आहे.

ड) सदर योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या आरसीसी साठवण तलावाची जलभेद चाचणी ठेकेदाराने अद्याप दिली नाही व त्यामुळे योजना अद्याप कार्यान्वित झालेली नाही. साठवण तलावाची गळती प्रतिबंधक योजना करुन साठवण तलावाची गळती बंद करुन ती योजना कार्यान्वित करणे आवश्यक आहे. मात्र संचालक(तांत्रिक) यांनी ठेकेदारावर निविदा कलम-३क अंतर्गत केलेली कार्यवाही योग्य नसल्याबाबत आदेश पारीत केल्याने त्याचप्रमाणे उच्च न्यायालयाने संचालक (तांत्रिक) यांनी दिलेला निर्णय योग्य असल्याचे मत दिल्याने सदर योजनेतील उर्वरीत कामे मूळ ठेकेदाराच्या जबाबदारी व खर्चावर करण्याच्या संदर्भात निविदा मागवू शकत नाही. मात्र ठेकेदार मे.व्ही.एम. मातेरे, पुणे यांनी त्यांचे क्लेम्स मिळावेत या साठी मा.जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे दाखल केलेल्या दाव्याच्या बाबतीत, अभ्यासू वकील नेमून कायदा व कामगार अधिकारी, मजीप्रा यांच्या सल्ल्यानुसार न्यायालयात मजीप्राची बाजू भक्कमपणे मांडण्याविषयी व गळतीस जबाबदार असलेल्या मे.शाकंबरी, ठाणे ही तज्ञ यंत्रणा व ठेकेदारावर उचित कार्यवाही करण्यात यावी, असे प्रस्तावित आहे.

सदर योजनेवर सुमारे रु.२३.५९ कोटी खर्च झालेला आहे. साठवण तलावाची गळती असल्याने योजना कार्यान्वित होऊ शकत नाही. साठवण तलावाची गळती प्रतिबंधक उपाययोजना करुन योजनेंतर्गत उर्वरित कामे पूर्ण करुन योजना कार्यान्वित करणे आवश्यक आहे. म्हणजे, योजनेवर झालेला खर्च उपयोगात आणता येईल.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा

योजना कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने आवश्यक कामांचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत मंजूरी घेण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर योजना आहे त्याच स्थितीत अंतिम करण्या (Fore-closer)विषयीचा प्रस्ताव शासनास सादर करण्याचे प्रस्तावित आहे.

संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये या प्रकरणी सविस्तर चर्चा होऊन, वरील प्रस्तावास मान्यता देण्यात आली व पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

अ) या कार्यालयाचे पत्र क्र.तांशा-२/६१३ दि.१६.९.२०२० नुसार गठीत करण्यात आलेल्या , श्री.सुभाष भुजबळ, मुख्य अभियंता (प्र), मजीप्रा, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली सौ.वैशाली आवटे, का.अ., मजीप्रा, पुणे, श्री.भांडेकर, का.अ., मजीप्रा, सोलापूर व श्री.सुबोध मोरे, स.का.अ., मजीप्रा, मनमाड या सदस्यांचा समावेश असलेल्या समितीने त्यांचे पत्र क्र.तांशा/६७७ दि.२३.४.२०२१ अन्वये, समितीने सादर केलेल्या अहवालामधील निष्कर्ष हे, तत्कालीन संचालक (तांत्रिक) यांचे आदेश क्र.संचालक(तां)/पानोडी/४९८, दि.७.६.२०१७ अन्वये निर्गमित केलेल्या निष्कर्षाशी मिळते जुळते असल्याचे निदर्शनास येते.

ब) सदर योजनेच्या साठवण तलावाच्या गळतीच्या संदर्भात चालू असलेल्या संबंधीत अधिकाऱ्यांवरील विभागीय चौकशीच्या संदर्भात मुख्य अभियंता, मजीप्रा, नाशिक यांनी त्यांचे पत्र क्र.तांशा-२/१२ दि.४.१२.२०१९ व पत्र क्र.प्रलि/पानोडी/४७५दि.१२.३.२०२१ अन्वये सादर केलेला अभिप्रायदर्शक अहवाल मान्य असून, योजनेतील साठवण तलावाची खोदाई व फाऊंडेशन ही कामे करणारे व योजनेचे बांधकाम करणारे ठेकेदार सुध्दा तितकेच जबाबदार आहे. त्याचप्रमाणे गळती काढण्याच्या कामाचे सल्लागार मे.शाकंभरी ही तज्ञ यंत्रणाही तितकीच जबाबदार आहे.

क) सदर योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या आरसीसी साठवण तलावाची जलभेद चाचणी ठेकेदाराने अद्याप दिली नाही व त्यामुळे योजना अद्याप कार्यान्वित झालेली नाही. साठवण तलावाची गळती प्रतिबंधक योजना करुन साठवण तलावाची गळती बंद करुन ती योजना कार्यान्वित करणे आवश्यक आहे. मात्र संचालक (तांत्रिक) यांनी ठेकेदारावर निविदा कलम-३क अंतर्गत केलेली कार्यवाही योग्य नसल्याबाबत आदेश पारीत केल्याने

अध्यक्ष तथा

सदस्य सचिव,

त्याचप्रमाणे उच्च न्यायालयाने संचालक (तांत्रिक) यांनी दिलेला निर्णय योग्य असल्याचे मत दिल्याने सदर योजनेतील उर्वरीत कामे मूळ ठेकेदाराच्या जबाबदारी व खर्चावर करण्याच्या संदर्भात निविदा मागवू शकत नाही. मात्र ठेकेदार मे.व्ही.एम. मातेरे, पुणे यांनी त्यांचे क्लेम्स मिळावेत या साठी मा.जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे दाखल केलेल्या दाव्याच्या बाबतीत, अभ्यासू वकील नेमून कायदा व कामगार अधिकारी, मजीप्रा यांच्या सल्ल्यानुसार न्यायालयात मजीप्राची बाजू भक्कमपणे मांडण्याविषयी व गळतीस जबाबदार असलेल्या मे.शाकंबरी, ठाणे ही तज्ञ यंत्रणा व ठेकेदारावर उचित कार्यवाही करण्यात यावी.

सदर योजनेवर सुमारे रु.२३.५९ कोटी खर्च झालेला आहे. साठवण तलावाची गळती असल्याने योजना कार्यान्वित होऊ शकत नाही. साठवण तलावाची गळती प्रतिबंधक उपाययोजना करुन योजनेंतर्गत उर्वरित कामे पूर्ण करुन योजना कार्यान्वित करणे आवश्यक आहे. त्यामुळे योजनेवर झालेला खर्च उपयोगात आणण्याच्या दृष्टीने योजना कार्यान्वित करण्याच्या संदर्भातील आवश्यक कामांचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत मंजूरी घेण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर योजना आहे त्याच स्थितीत अंतिम करण्या (Fore-closer) विषयीचा प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

यासाठी पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.६ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या नवी मुंबई (सीबीडी बेलापूर, नेरुळ व वाशी) परिसरातील विखुरलेल्या निवासस्थानांच्या विक्रीबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि. २३.११.२०११ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळाच्या १२२ व्या बैठकीमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या नवी मुंबई परिसरातील (सिबीडी बेलापूर, नेरुळ व वाशी) विखुरलेली रिक्त निवासस्थाने बाजारभावाने व

अध्यक्ष तथा

सदस्य सचिव,

जाहिरात देवून जास्त देकार देणाऱ्या व्यक्तीस/ कर्मचा-यास विकण्याबाबत ठराव संमत करण्यात आला होता. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या दि. २०.०९.२०१२ रोजीच्या १२५ व्या बैठकीमध्ये तत्कालीन मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागरी व ग्रामीण योजना, ठाणे यांचे अध्यक्षतेखाली गठीत निविदा तपासणी समितीने शिफारस केल्याप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या विखुरलेल्या ५२ रिक्त सदनिकांपैकी ४९ सदनिका विक्री करण्यास अंतिम मान्यता देण्यात आली होती. उर्वरित ३ सदनिकांच्या विक्रीसाठी फेर निविदाची यथा योग्य वेळी कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याचे सूचित करण्यात आले होते. पात्र ४९ निविदाधारकांपैकी ३८ निविदाधारकांनी मंजूर बोलीप्रमाणे देकाराची १००% रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास जमा केली असल्याने ३८ निविदाधारक अंतिमरित्या पात्र ठरतात.

सदनिकांच्या विक्री संदर्भात श्रीमती मयेकर व इतर यांनी सन २०१३ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. २८९०/२०१३ अन्वये दावा दाखल केला होता. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे दि. ०१.०३.२०२१ च्या अंतिम सुनावणीच्या आदेशान्वये प्रतिवादी क्र.५ ते ४२ यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या वाटप करण्यात आलेल्या सदनिकांच्या विक्रीबाबत पुढील सर्व औपचारिकता निकालाच्या दिनांकापासून ८ आठवडयांमध्ये पूर्ण करण्याचे निर्देश असल्याने याबाबतची कार्यक्रम बाब संचालक मंडळाच्या बैठकीसमोर ठेवण्यात आली. सदर कार्यक्रम बाबीवर या बैठकीमध्ये चर्चा होवून खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

<u>ठराव:</u>

असा ठराव करण्यात येतो कि,

(अ) नवी मुंबई (सीबीडी बेलापूर, नेरुळ व वाशी) परिसरातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या विखुरलेल्या एकुण ४९ रिक्त सदनिकांपैकी वाटप करण्यात आलेल्या ३८ सदनिका मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार प्रतिवादी क्र. ५ ते ४२ यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सदनिका विक्री करण्यासंदर्भातील पुढील सर्व औपचारिकता पूर्ण करण्यास निविदेच्या अटी/शर्तीनुसार व तसेच सिडकोच्या अटी/शर्तीनुसार मान्यता देणेत येत आहे.

मा. उच्च न्यायालयाच्या उक्त आदेशानुषंगाने मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, ठाणे यांचेमार्फत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग,

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

पनवेल यांना प्रस्तुत प्रकरणी योग्य सखोल तपासणी करुन, सत्यता पडताळून व तसेच निविदेतील अटी/शर्ती पूर्ण केल्याची खात्री करुन प्रतिवादी क्र. ५ ते ४२ यांना सदनिकांची अंतिमरित्या विक्री करण्यासंदर्भात पुढिल सर्व औपचारिकता पूर्ण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

(ब) मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण (MMRDA) परिसरातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या विखुरलेल्या रिक्त सदनिकांचा पुन:श्च एकत्रित सविस्तर आढावा मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, ठाणे यांनी घेवून त्याबाबतचा सविस्तर अहवाल/प्रस्ताव सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना सादर करावा. तद्नंतर प्राप्त अहवाल/प्रस्ताव संचालक मंडळापुढे सादर करण्यास मान्यता देणेत येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.७ :-** शासकीय/निमशासकीय सेवेतून सेवा निवृत्त झालेल्या अभियंत्यांना व सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना म.जी.प्रा.मध्ये कंत्राटदार नोंदणी देण्याबाबत.

मा. संचालक मंडळाची दि. १६ जुन २०२१ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत शासकीय/निमशासकीय सेवेतुन सेवा निवृत्त झालेल्या अभियत्यांना कंत्राटदार नोंदणी देणे व सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना मजीप्रामध्ये कंत्राटदार नोंदणी दर्जात वाढ करणे बाबत सविस्तर चर्चा झाली. यामध्ये शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचा दि.०५.०१.२०१९ चा शासन निर्णय (शासकीय/निमशासकीय सेवेतुन सेवा निवृत्त झालेल्या अभियत्यांना मजीप्रामध्ये कंत्राटदार नोंदणी देण्याबाबत.) तसेच दि. ३१.०५.२०१८. चा शासन निर्णय (सुशिक्षित बेरोजगार अभियत्यांना कंत्राटी कामे देण्याबाबत.) च्या निर्णयातील तरतुदी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नोंदणी नियमावलीमध्ये समाविष्ठ करण्याबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. सदर कार्यक्रम बाबी वर सविस्तर चर्चा करण्यात आली व त्या बाबतचा ठराव खालील प्रमाणे पारीत करण्यात आला.

किशोरराजे निंबाळकर

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**ठराव:-**

अ)**शासकिय/ निम-शासकिय सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या अभियंत्यांना मजीप्रामध्ये कंत्राटदार नोंदणीबाबत.**

असा ठराव करण्यात येतो की, शासकिय/ निम-शासकिय सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या अभियंत्यांना मजीप्रामध्ये कंत्राटदार नोंदणीबाबतची कार्यवाही करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि.०५.०१.२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदी मजीप्रास लागु करण्याच्या कार्यवाहीस खालील प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे. यानुषंगाने पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

१. कार्यकारी अभियंता पदापेक्षा निम्न पदावरुन सेवा निवृत्त झालेल्या स्थापत्य अभियंत्यांना रु. ९० लक्ष रकमेसाठी व विद्युत अभियंत्यांना रु १० लक्ष साठी नोंदणी देण्यात यावी.

२. कार्यकारी अभियंता व त्यापेक्षा उच्च पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या स्थापत्य् अभियंत्यांना रु. १५० लक्ष रकमेसाठी व विद्युत अभियंत्यांना रु २५ लक्ष साठी नोंदणी देण्यात यावी.

३. सेवा निवृत्त अभियंत्यांना कंत्राटदार म्हणुन नोंदणी करताना त्यांना शासनाकडुन/सक्षम प्राधिकाऱ्याकडुन ना देय/ना चौकशी प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

४. इच्छुक अभियंता यांना पतधारीप्रमाणपत्र (Solvency Certificate) , सुरक्षाठेव अनामत रक्कम (Security Deposit), इसारा रक्कम (Earnest Money) इत्यादी बाबतचे नियम अन्य ठेकेदाराप्रमाणेच राहतील. तथापी निवृत्त अभियंता यांना नोंदणी वेळी वार्षिक उलाढाल तसेच हातातील कामे यामध्ये सुट देण्यात येत आहे.

५. शासकीय कर्मचाऱ्याने सेवानिवृत्तीच्या शेवटच्या वर्षभरात ज्या विभागात काम केलेले आहे त्या विभागात सेवानिवृत्ती नंतर १ वर्षाच्या कालावधी साठी निविदा भरता येणार नाही.

६. कार्यकारी अभियंता पदापेक्षा निम्न पदावरुन सेवा निवृत्त झालेल्या स्थापत्य अभियंत्यांना व विद्युत अभियंत्यांना शासकीय सेवेतील अनुभवाच्या आधारे अनुक्रमे रु. ३०० लक्ष व रु ५० लक्ष रकमेची कामे अथवा ३ वर्ष या पैकी जे

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

लवकर असेल तो पर्यंत प्रत्यक्ष काम केल्याच्या अनुभवाच्या दाखल्याची निविदा प्रक्रियेत आवश्यकता नाही. तसेच आवश्यक यंत्रसामुग्री बाबत देखील उपरोक्त कालावधीत शिथिलता देण्यात येत आहे.

७. कार्यकारी अभियंता व त्यापेक्षा उच्च् पदावरुन सेवा निवृत्त झालेल्या स्थापत्य अभियंत्यांना व विद्युत अभियंत्यांना शासकीय सेवेतील अनुभवाच्या आधारे अनुक्रमे रु. ५०० लक्ष व रु १०० लक्ष रकमेची कामे अथवा ३ वर्ष या पैकी जे लवकर असेल तो पर्यंत प्रत्यक्ष काम केल्याच्या अनुभवाच्या दाखल्याची निविदा प्रक्रियेत आवश्यकता नाही. तसेच आवश्यक यंत्रसामुग्री बाबत देखील उपरोक्त कालावधीत शिथिलता देण्यात येत आहे.

८. निवृत्त अभियंता यांना सदरील सुट ही सेवा निवृत्ती नंतर/ राजीनाम्यानंतर ५ वर्षाच्या आत अर्ज केल्यास मिळु शकेल.

**ब)सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना मजीप्राच्या कंत्राटदार नोंदणी नियमावलीत सुधारण करणे.**

असा ठराव करण्यात येतो की, सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना कंत्राटदार नोंदणी म्हणुन नोंदणी देण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत शासन निर्णय दि. ३१.०५.२०१८ निर्गमित करण्यात आलेला आहे.

सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांच्या अद्यावत तंत्रज्ञानाचा उपयोग शासनाच्या कामामध्ये होवुन कामे उत्तम व दर्जेदार होण्याच्या दृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील खालील तरतुदी नुसार सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना मजीप्राकडे कंत्राटदार नोंदणी करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

अ. सद्यस्थितीत स्थापत्य अभियंत्यांना वर्ग-VI म्हणजेच रु. १५ लक्ष व विद्युत अभियंत्याना वर्ग-D म्हणजेच रु. १० लक्ष करीता कंत्राटदार नोंदणी देण्यात येत आहे. दि.३१.०५.२०१८ च्या शासन निर्णया नुसार स्थापत्य अभियंत्यांना आता वर्ग-IV म्हणजेच रु. १५० लक्ष करीता कंत्राटदार नोंदणी देणेस मंजुरी देण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

विद्युत अभियंत्याना वर्ग-D म्हणजेच रु. १० लक्ष करीता कंत्राटदार नोंदणी देण्यात येत आहे तथापि आता विद्युत व यांत्रिकी अभियंत्याना वर्ग-D म्हणजेच रु. १० लक्ष करीता कंत्राटदार नोंदणी देणेस मंजुरी देण्यात येत आहे. त्यानुसार अस्तित्वातील अटी व शर्ती मध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अस्तित्वातील अटी | सुधारणा प्रस्तावित |
|---|---|---|
| १-अ | Unemployed Graduates / A.M.I.E., Diploma holders in Civil / Electrical-Mechanical engineering who are domiciled in Maharashtra state and have passed the qualifying examination and have obtained the degree or diploma from University / Institution, recognized by the Director of Technical Education of Maharashtra State / State concerned, may get themselves directly registered in **class-VI (Rs. 15 Lakhs) in case of Civil Engineers and in Class-D (Rs. 10 Lakhs) in case of Electrical Engineers.** | Unemployed Graduates / A.M.I.E., Diploma holders in Civil / Electrical-Mechanical engineering who are domiciled in Maharashtra state and have passed the qualifying examination and have obtained the degree or diploma from University / Institution, recognized by the Director of Technical Education of Maharashtra State / State concerned, may get themselves directly registered in **class-IV (Rs. 150 Lakhs) in case of Civil Engineers and in Class-D (Rs. 10 Lakhs) in case of Electrical/Mechanical Engineers.** |
| १-ब | The Engineers registered as above shall be exempted from the payment if (i) Earnest money and (ii) security deposits to be extent of **50%** of what is normally due in each case.In respect of **50%** of security deposit (which is required to pay) a nominal amount of **1%** of the estimated cost subject to a minimum of Rs.**100/-** shall be recovered initially and the rest by a pro-rata deduction from bills. | This condition is cancelled. The contractor will have to pay the earnest money and security deposit as per tender conditions. |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| | | |
|---|---|---|
| १-क | The members who have completed Building maintenance and civil Engineering Assistance course from ITI and vocational Training Board may get registred in class VII.They have to apply in prescribed proforma along with attested copy of<br>a) Certificate of particular course b) Solvecy certificate c) Registration fee d) Domicile certificate. | This condition will remain same. |
| | नोट- वरिल बाब क्र. १ वगळुन यापुर्वीच्या इतर सर्व अटी व शर्ती आहे तशाच कायम राहतील. | |

यानुषंगाने पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्रमांक-१ :**

**विषय :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय संकुल, होलाराम कॉलनी, नाशिक येथील इमारत दुरुस्ती, नुतनीकरण व रंगकामासाठी लागणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय संकुल, होलाराम कॉलनी, नाशिक येथील इमारत दुरुस्ती, नुतनीकरण व रंगकामासाठी लागणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव कार्यक्रम बाबीनुसार संचालक मंडळापुढे पुढीलप्रमाणे सादर करण्यात आला.

दि.१२.६.२०२१ रोजी नाशिक येथील आढावा बैठकीच्या वेळी सदस्य सचिव, मजीप्रा यांनी सर्व कार्यालयीन इमारतींची पाहणी केली त्यावेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय संकुल, होलाराम कॉलनी, नाशिक येथील इमारतीला दुरुस्ती, नुतनीकरण व रंगकामाची आवश्यक असल्याने याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याविषयी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, नाशिक यांना सूचना देण्यात आल्या होत्या.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

त्यास अनुसरुन, होलाराम कॉलनी, नाशिक येथील इमारतीच्या दुरुस्ती, नुतनीकरण व रंगकामासाठी अंदाजे रु.५५.०० लक्ष इतका खर्च लागणार असल्याचे कार्यकारी अभियंता, नाशिक यांनी त्यांचे पत्र क्र.लेखा/८७३ दि.१६.६.२०२१ अन्वये कळविले आहे.

सदर इमारतीच्या दुरुस्तीसाठी पुढील अटी व शर्तींच्या अधिन राहून, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या घसारा निधीतून रु.५५.०० लक्ष इतकी रक्कम उपलब्ध करुन देण्याविषयी मा.संचालक मंडळास विनंती करण्यात आली.

संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये या प्रकरणी सविस्तर चर्चा होऊन, वरील प्रस्तावास मान्यता देण्यात आली व पुढीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय संकुल, होलाराम कॉलनी, नाशिक येथील इमारत दुरुस्ती, नुतनीकरण व रंगकामासाठी लागणाऱ्या रु.५५.०० लक्ष इतक्या खर्चास मजीप्राच्या घसारा निधीतून तरतूद करण्यात यावी. यासाठी सन २०२१-२२ च्या दरसूचीवर आधारित सविस्तर दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास सक्षम अधिकाऱ्यांची मान्यता कार्यकारी अभियंता यांनी प्राप्त करुन घ्यावी व या कामासाठी प्रचलित नियमानुसार ई-निविदा प्रक्रिया करुन कामाची अंमलबजावणी करण्यात यावी.

यासाठी पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.